# नात्यांमधील अंतर...न मापता येणारे

"अगं , तुला कळले का? कुणाल आणि पूजाचा घटस्फोट झाला ते?" माझ्या एका मैत्रिणीने बातमी दिली आणि धक्काच बसला. हे दोघे माझे कॉलेज मधले मित्र .. पण एकमेकांना अनोळखे...कुणाल तल्लख बुद्धीचा, अभ्यासू, मितभाषी.. पण पुस्तकी किडा. ..तर पूजा अगदी विरूद्ध....बडबडी, आयुष्याचा मनमुराद आस्वाद घेणारी.... माझ्या लग्नातच पहिल्यांदा भेटले...म्हणतात ना...परस्पर विरोधी स्वभाव नेहमी एकमेकांकडे आकर्षित करतो. आणि अगदी तसेच झाले....सहा महिन्याच्या आत धुमधडाक्यात लग्न झाले?पण कुणालची नोकरी होती अमेरिकेत..त्यामुळे तो लग्न झाल्यांनतर १ आठवड्यात तिकडे गेला. तिचा व्हिसा झाल्यावर ती पण येणार होती..पण कुठे माशी शिंकली काय माहित? २ वर्षे झाली तरी तिला व्हिसा मिळत नव्हता. आता एक शेवटचा प्रयत्न म्हणून ती व्हिसा ऑफिसमध्ये गेली आणि नाचतच बाहेर आली...आम्हाला सगळ्यांना खूप आनंद झाला होता.. चला एकदाचे...दोघे जवळ आले...असे वाटत असताना...अचानक अशी बातमी येऊन आदळली कि मन क्षणभर सुन्न होऊन गेले..

काय घडले असावे?? आपल्या मनाला न पटणारी कोणतीही गोष्ट घडली कि आपले मन सतत त्याचा पाठपुरावा करत असते..का घडले? कसे घडले..? असे नको होते व्हायला...आपण अजूनही काही मदत करू शकतो का?. पूजाशी बोलल्यावर कळले कि २ वर्षे एकत्र न राहिल्याने.त्यांच्यामधला संवाद कमी होत गेला....तो सतत कामात व्यस्त राहायचा..त्याची नवीनच नोकरी होती ..पण तरी आपले लग्न झालेय, पूजा आपल्या फोनची वाट बघत असेल..दिवसातला निदान थोडा तरी वेळ तिच्याशी फोनवर बोलायला हवे...ह्याची त्याला जाणीव झाली नाही. लग्न होण्याअगोदर...बात निराळी...आणि झाल्यानंतरची तर आणखीन वेगळी. लग्नानंतर बायकोची आपल्यावर जबाबदारी असते, आपल्या आईवडिलांवर नाही...हे त्याच्या गावातच नव्हते. पूजा त्याच्या फोनची आतुरतेने वाट बघत असायची..आणि त्याचा फोन किंवा त्याच्याशी संपर्क झाला नाही कि रडायला लागायची..मी तिकडे गेले कि ठीक होईल सगळे..या आशेवर..जगत राहिली. कालांतराने त्यांच्यातला विसंवाद हळू हळू वाढत गेला आणि एकत्र राहायला लागल्यावर...त्याला आतापर्यंत नसलेली तिची सवय...अडचण वाटयला लागली. त्यांच्यात मतभेद... खटके.. वादविवाद..सुरु झाले...बरोबरच होते म्हणा...दोघेही भिन्न प्रवुत्तीचे...त्यात मोठ्यांचा आधार नाही कि त्यांचे मार्गदर्शन नाही ...प्रेमात सगळे जग सुंदर दिसते...परंतु खरे जेव्हा एकत्र राहायची वेळ येते..तेव्हा कुठे...आपण एकमेकांना खऱ्या अर्थाने ओळखू लागतो...कोणत्याही नात्यांमध्ये जुळवून घ्यावे लागतेच. परंतु कुठे जुळवून घ्यावे....हे ज्याने त्याने सारासार विचार करून ठरवायचे असते...तेव्हाच मनाचे बंध जुळायला लागतात..

मग ह्यां दोघांबाबतीत त्यांची मने जुळली असतील का? नाहीच? कारण मग अशी घटस्फोट घ्यायची वेळच का आली असती..? काही गोष्टी आपल्या हातात नसतात...परंतु ज्या आपल्या हातात असतात, त्यांकडे पूर्ण दुर्लक्ष्य करतो?.तसे बघायला गेलो तर दोघेही समजूतदार होते..दोघांना जरा शांत बसून समजावले असते...एकमेकांशी जुळवून घ्यायला वेळ दिला असता तर? बरं कोणीही एकाने जरी एक पाउल मागे घेतले असते तरी ते त्याच्यावर आयुष्यभर दडपण आणल्यासारखे झाले असते.. पण दोघेही आपले मतभेद ताणत गेले..आणि जे व्हायचे ते झाले..

आज आपण समाजात वावरताना अनेक उदाहरणे बघतो. नवरा–बायको आपापली कारकीर्द सांभाळण्यासाठी म्हणा...किंवा कुटुंबाच्या काळानुसार वाढणाऱ्या गरजांसाठी म्हणा,..लग्न करूनही वेगवेगळ्या शहरात राहताना दिसून येतात. बरे जवळच्या शहरांत म्हणाल तर ते पण नाही, एक जगाच्या ह्या टोकाला तर दुसरा त्या टोकाला. अश्या वेळेस एकमेकांमध्ये नीट समन्वय व संपर्काची देवाण घेवाण असणे महत्वाचे. लग्न झाल्यावर एकत्र राहून एकमेकांना समजून घेऊन..स्वताच्या, आपल्या जोडीदाराच्या आवडीनिवडी लक्षात घ्यायला यांना वेळ तरी मिळत असेल का? लग्नाआधी प्रत्येकजण हवेत तरंगत असतो...किवा..सगळ्यांपेक्षा छान जोडीदार मिळालाय असे म्हणून आपणच खूप कौतुक करतो...मात्र हेच सगळे..लग्नानंतर उलटे वाटायला लागते...तू आधी असा/अशी वागायचा/ची नाही म्हणून कुरबुरी सुरु होतात...ह्या का होतात?? लग्नानंतर तो/ती असंच वागेल अशी अपेक्षा आपण करत असतो...किंबहुना आपण गृहीतच धरतो?.

पण आपण या सगळ्यांमध्ये एक गोष्ट विसरतो...प्रत्येक माणसाचे वेगळे स्वभाव वैशिष्ध्य असतात...ती एक स्वतंत्र व्यक्ती आहे..तिला स्वताचे विचार आहे..स्वाभिमान, भावना आहे?काही ठाम मते आहेत, काही आदर्श आहे...आपले विचार मांडायची वेगळी पद्धत आहे..ह्या सगळ्यांचा जेव्हा एकत्रित रित्या दोघे मिळून विचार करतील.. एकमेकांचे स्वातंत्र्य जपतील..विश्वासाने एकमेकांना समजून घेतील....तेव्हा नक्कीच त्यांच्या मनाचे ऋणानुबंध जुळले असे आपण म्हणू शकू. माझ्या ओळखीत असे पण एक जोडपे आहे कि ते लग्नानंतर ५ वर्षे झालीत पण नोकरीमुळे वेगळे राहत आहे. त्यांना अश्या काही समस्या आल्या नसतील का? कि वेगळे राहायचेच होते तर एवढ्या लवकर लग्न का केले..? असे टोमणे त्यांना ऐकायला नसतील का गेले??..परंतु .त्यांच्यातला सामंजस्य आणि विश्वासाचा धागा इतका पक्का आहे कि...जेव्हा ते वर्षातून एकदाच...नाताळच्या सुट्टीत ऐकत्र येतात तेव्हा असे जाणवत नाही कि वर्षातून एकदाच भेटत आहे ते...हल्ली जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात असो.. इंटरनेट आल्याने ई–मेल, ...फेसबुक..स्काईप..ह्यामुळे एकमेकांच्या सान्निध्यात राहता येते..आणि त्याचाच वापर करून..ते एकमेकांतले अंतर दूर करण्याचा प्रयत्न करत असतात. असे थोडे फार प्रयत्न जर कुणाल किंवा पूजाने केले असते तर.. ?

हे झाले ऐकमेकांपासून व्यक्तिशः दूर राहिल्यामुळे....परंतू त्यांचे काय जे समाजाच्या दृष्टीने एकत्र असतात...पण मनातील अंतराने एकमेकांपासून दूर गेलेले आहेत? ६–७ वर्षे सुखाचा संसार चालू असताना...अचानक त्यांची वेगळे झाल्याची बातमी कानावर आदळते... तेव्हा क्षणभर मन सुन्न होऊन जाते..सगळे सुरळीत चालले असताना कुठून ही अवदसा त्यांना सुचली...खूप गोड खाल्ले कि मधुमेह होतोच...अश्या वेळेस मला एक संस्कृत श्लोक आठवतो..

‘अतिपरिचयादवज्ञा सन्ततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरन्ध्री चन्दनतरुकाष्टमिन्धनं कुरुते ॥’

जर कोणाच्या (नातेवाईकांच्या) घरी सतत जात राहिले तर अति परिचयामुळे आपला नेहमी अनादर होतो. जसे मलय पर्वतावरचे भिल्ल चंदनासारख्या किमंती लाकडांचा रोजचे इंधन म्हणून वापर करतात.

तसेच या जोडप्यांमध्ये होत असेल का? म्हणजेच ते एकमेकांना गृहीत धरतात, अवमान करायला लागतात..त्यांचे स्वतःचे महत्वाचे स्थान, एकमेकांबद्दलची ती ओढ हरवून बसतात. रोजच्या वागण्या बोलण्यातून, व्यवहारातून एकमेकांशी रोजच्या सवयीने वेड्यासारखे धुसफुसत असतात. कदाचित वैफल्यग्रस्त होऊन या धकाधकीच्या जीवनात कोणावरचा तरी राग काढत असतात, किंवा याच्या उलट राग आला तरी..गोड गोड बोलत असतात...मनातून शिव्या आणि तोंडावर हसू..असे वेड्यासारखे वागत असतात. आपल्या आयुष्यात ज्यांना महत्वाचे स्थान आहे अश्या चंदनासारख्या किंमती जोडीदाराला जो आपल्याच सुखासाठी कायम झिजत असतो, त्यालाच आपण गृहीत धरतो, त्यांच्या मतांचा आपण अनादर करायला शिकतो आणि त्यातच एकमेकांना वेळ देऊ शकलो नाहीत कि मग अंतर निर्माण होते, मनमोकळेपणाने बोलु शकत नाही..मतभेद होऊ लागतात. त्यावर उपाय काढण्याऐवजी ते मतभेद ताणायलो लागतो आणि अश्या प्रकारे आपल्याच सोन्यासारख्या माणसांच्या मनात आपल्याबद्दल आगेची ठिणगी पडायला कारणीभूत ठरतो. मग याचा विपर्यास भांडणातून घटस्फोटाकडे होतो.

तात्पर्य काय तर जवळ असो किंवा लांब असो? दोघांच्या नात्यातले अंतर, स्थान सुरक्षित ठेवले तर आपल्या नात्यातला गोडवा टिकून राहील..यामध्ये छोट्या कुरबुरी, लहानसहान भांडणे, अनेक संकटे यांचे पण स्वागत आहेच..त्यशिवाय गोडी कशी टिकून राहील..कोणत्याही चमचमीत खमंग पदार्थाला..मिठामुळेच तर चव येते. दोघांमध्ये कोणी कधीच परिपूर्ण नसतो. एकमेकांचे गुणदोष गुंफतच संसाराची दोरी बळकट करता येते. दोघांचा आयुष्याचा प्रवास हा आगगाडीच्या रूळाप्रमाणे असतो. (त्या दोन रूळामध्ये मध्येही सुरक्षित अंतर असतेच) दोघांनाही एकाच दिशेला जायचे असते. त्यांच्या संसाराची आगगाडी त्यांच्यात एकमेकांबद्दल असलेल्या.. प्रेम, विश्वास, आदर, संवाद, समन्वय या बंधनामुळे मुळे सुसाट धावत असते...त्यामुळे कुठे ब्रेक लागला तर तेही आपल्याला तपासून बघता येते.. चांगल्या नात्यामध्ये संवाद हाच तर मुख्य घटक आहे. त्यामुळे जर आपल्याला आयुष्याच्या प्रत्येक वळणावर सुखाचा, आनंदाचा प्रवास करायचा असेल तर आतापासूनच...आपल्यापासूनच...प्रेमाचे आणि विश्वासाचे खतपाणी घालून एकमेकांतील

संवादाची वेल आकाशाएवढी नेऊ.. तरच नात्यातल्या अंतराने, विसंवादाने...अशी वेगवेगळी हसरी फुले कोमेजून जाणार नाहीत.

– **प्रांजल नेरुरकर** (शार्लट, नॉर्थ कॅरोलायना)